पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काजळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १७२। किंमत - ५ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार १७/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

## दिल्लीत सोनम वांगचूक यांचे आमरण उपोषण



## १९ दिवसांपासून अन्नत्याग

### सरकारच्या मौनावर संताप

### प्रकृती खालावत असतानाही केंद्राकडून दखल नाही

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांचे दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेले आमरण उपोषण आता अधिक गंभीर टप्प्यात पोहोचले आहे. उपोषणाचा गुरूवार १९ वा दिवस असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे वैद्यकीय अहवालांमधून समोर आले आहे. वजनात लक्षणीय घट, अशक्तपणा आणि रक्तदाब कमी झाल्याचे डॉक्टरांनी नमूद केले असूनही केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नाही.

सोनम वांगचूक यांनी परीक्षा व्यवस्थेतील कथित गैरव्यवहार, विद्यार्थ्यांवरील अन्याय आणि जबाबदारी निश्चित करण्याच्या मागण्यांसाठी उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाला विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांचा पाठिंबा मिळत आहे. जंतरमंतरवर दररोज नागरिकांची उपस्थिती वाढत असली तरी सरकारकडून कोणतीही सकारात्मक भूमिका समोर आलेली नाही.

उपोषणामुळे वांगचूक यांची प्रकृती खालावत असल्याने त्यांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर दिल्ली उच्च न्यायालयात याचिकाही दाखल झाली असून, न्यायालयाने केंद्र सरकार आणि दिल्ली सरकारला नोटीस बजावत उत्तर मागवले आहे. न्यायालयाने या प्रकरणाची तातडीने दखल घेत वैद्यकीय हस्तक्षेपाबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

सरकारच्या सातत्यपूर्ण मौनामुळे संतापाची लाट उसळत असून, लोकशाहीत शांततामय आंदोलनालाही प्रतिसाद मिळत नसेल, तर ही चिंतेची बाब आहे, अशा प्रतिक्रिया विविध स्तरांतून उमटत आहेत. उपोषणस्थळी उपस्थित समर्थकांनी सरकारने तातडीने संवाद साधून प्रश्न सोडवावेत, अशी मागणी केली आहे. दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी येत्या काही दिवसांत संसदेकडे मोर्चा काढण्याचा इशाराही दिला आहे. सोनम वांगचूक यांनी स्वतः नागरिकांना शांततामय मार्गाने लोकशाहीसाठी आवाज उठवण्याचे आवाहन केले असून, हा केवळ माझा लढा नसून देशातील विद्यार्थ्यांच्या आणि उत्तरदायी व्यवस्थेच्या भविष्यासाठीचा संघर्ष आहे, असे त्यांनी म्हटल्याचे वृत्त आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर वांगचूक यांनी आमरण उपोषण सुरू ठेवले आहे. विरोधी काँग्रेस, शिवसेना, मनसे व इतर पक्षांनी केवळ सहानुभूती व्यक्त करत पाठिंबा दिला. सरकारनेही त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे १९ व्या दिवशीही हे उपोषण सुरू असून त्यांचे प्राण कंठाशी आले आहे.

## संगमनेरात वाढत्या गुन्हेगारीने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

### श्रीरामपूर पेटले, संगमनेरने बोध घ्यावा...




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यात वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे कायदा आणि सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असताना, संगमनेर शहर आणि तालुक्यातही गुन्हेगारी प्रवृत्ती डोके वर काढत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. किरकोळ कारणांवरून जीवघेणे हल्ले, टोळक्यांकडून मारहाण, दहशत माजविण्याचे प्रकार आणि अवैध धंद्यांमुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेबाबत चिंता वाढत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे अलीकडे घडलेल्या एका हॉटेल व्यावसायिकाच्या हत्येनंतर गुन्हेगारीविरोधात नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. या पार्श्वभूमीवर संगमनेरमध्येही अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी आताच कठोर पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

संगमनेरमध्ये भरदिवसा हातात कोयते घेऊन फिरणे, टोळक्यांकडून दहशत निर्माण करणे, किरकोळ वादाचे रूपांतर गंभीर हाणामारीत होणे आणि विरोध करणाऱ्यांवर जीवघेणे हल्ले होण्याच्या घटनांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत असल्याचे बोलले जात आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि व्यापारी वर्गामध्ये याबाबत चिंता व्यक्त होत आहे.

शहर व तालुक्यात गौतस्करी, अवैध वाळू उपसा, अवैध दारू विक्री, गुटखा, मटका यांसारखे बेकायदेशीर व्यवसाय सुरू असल्याचे आरोप वेळोवेळी होत आहेत. या अवैध धंद्यांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने गुन्हेगारी प्रवृत्तीला बळ (पान ३)

## ...तर जनतेचा नेत्यांवरील विश्वास उडेल - मुनगंटीवार

मुंबई (वृत्तसंस्था)

शरद पवार यांचा पक्ष 'एनडीए'त सहभागी होणार असल्याच्या केवळ अफवा आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत आधीच स्पष्ट भूमिका मांडली आहे. मुख्यमंत्र्यांच्या विधानानंतर अवघ्या १५ दिवसांत जर शरद पवार एनडीएमध्ये आले, तर जनतेचा राजकीय नेत्यांवरील विश्वासच उडून जाईल, असा थेट दावा भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे. शरद पवारांचा पक्ष एनडीएमध्ये येईल याबाबत मला व्यक्तिशः शंका असून, देवाच्या इच्छेने मी सध्या मंत्रिमंडळातून बाहेर आहे, अशी मिश्किल टिप्पणीही त्यांनी यावेळी केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाबाबत राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या उलट-सुलट चर्चांवर मुनगंटीवार यांनी स्पष्टीकरण दिले. मुनगंटीवार म्हणाले की, राजकारणात कोणीही कोणाचे महत्त्व कमी करू शकत नाही. नेत्याच्या स्वतःच्या चुकांमुळेच पक्षाचे किंवा त्याचे महत्त्व कमी होत असते. एकनाथ शिंदे हे भाजपचे खंदे मित्र आहेत. भाजप विरोधी बाकांवर असताना ते सत्ता सोडून आमच्यासोबत आले. त्यामुळे त्यांचे महत्त्व कमी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही; आणि तसा प्रयत्न झाला तर ते जनतेलाही खपणार नाही.

## जलजीवन मिशनच्या साडेचार लाखांच्या पाईप चोरीचा प्रयत्न फसला

### ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे टेम्पोसह चालक ताब्यात



### सात साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पसार

घारगाव । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन योजनेसाठी ठेवण्यात आलेल्या सुमारे **साडेचार लाख रुपये किमतीच्या ४० डीआय के-९ पाइपांची चोरी करण्याचा प्रयत्न ग्रामस्थांच्या प्रसंगावधानामुळे हाणून पाडण्यात आला. ग्रामस्थांनी पाठलाग करून आयशर टेम्पोसह चालकाला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले, तर त्याचे सात साथीदार अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेमुळे जलजीवन मिशनच्या साहित्याच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

जवळे बाळेश्वर व परिसरातील गावांसाठी राबविण्यात येणाऱ्या जलजीवन मिशन योजनेचे काम एस.टी.एम. इन्का प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडे आहे. या योजनेसाठी विविध आकारांचे डीआय पाइप वरुडी पठारसह विविध ठिकाणी साठवून ठेवण्यात आले आहेत.

कंपनीचे सुपरवायझर चेतन अरुणराव बेडसे यांनी घारगाव पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, १४ जुलैच्या मध्यरात्री रंगनाथ फटांगरे यांनी फोन करून काही अज्ञात व्यक्ती आयशर टेम्पोमध्ये पाइप भरत असल्याची माहिती दिली. कंपनीकडून कोणतेही वाहन किंवा कर्मचारी त्या ठिकाणी पाठविण्यात आले नसल्याचे स्पष्ट होताच ही चोरी सुरू असल्याचा संशय बळावला.

त्यानंतर ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत संशयित वाहनावर लक्ष ठेवले. दरम्यान, संदीप भास्कर भागवत यांनी पुणे-नाशिक महामार्गावरील वरुडी फाटा येथे एचआर-३८-ए-७१८४ क्रमांकाचा आयशर टेम्पो अडवला. चौकशीदरम्यान चालकाने आपले नाव इरशाद अलीशेर खान (रा. सिलाकडी, ता. धौज, हरियाणा) असे सांगितले. मात्र, त्याच्यासोबत असलेले सात जण ग्रामस्थ येत असल्याचे पाहून अंधाराचा फायदा घेत पळून गेले.

पोलिसांनी चालकाला ताब्यात घेत टेम्पोसह चोरीसाठी भरलेले ४० डीआय के-९ पाइप जप्त केले आहेत. या प्रकरणी घारगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे जलजीवन मिशनच्या कामासाठी विविध ठिकाणी साठवून ठेवलेल्या साहित्याच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ग्रामस्थांच्या जागरूकतेमुळे मोठे नुकसान टळले

घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी ग्रामस्थांच्या सतर्कतेचे कौतुक केले. वेळेवर संशय आल्याने लाखो रुपयांचे शासकीय साहित्य चोरीला जाण्यापासून वाचले. रंगनाथ फटांगरे, उपाध्यक्ष, बाळेश्वर देवस्थान ट्रस्ट म्हणाले, (पान ४)

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
नियम व अटी लागू.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# समरवीर देशमुखची राज्यस्तरीय कौशल्य चाचणीत चमकदार कामगिरी!

## मालपाणी हेल्थ क्लबचा युवा जलतरणपटू; बालेवाडीच्या क्रीडा प्रबोधिनीत मिळवला प्रवेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मालपाणी हेल्थ क्लबचा युवा जलतरणपटू समरवीर देशमुख याने जलतरणातील राज्यस्तरीय कौशल्य चाचणी चमकदार कामगिरी केल्यामुळे त्याला पुण्यातील बालेवाडी मधील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल क्रीडा प्रबोधिनी मध्ये सन्मानपूर्वक प्रवेश देण्यात आला आहे. समरवीरने गुणवत्तेच्या बळावर मिळविलेल्या या प्रवेशाबद्दल अनेकांनी त्याचे अभिनंदन केले असून त्याच्या जलतरणातील भावी कारकीर्दीला शुभेच्छा दिल्या आहेत.

याबाबत समरवीरच्या मातोश्री रेश्मा देशमुख यांनी प्रसिद्धी माध्यमांना सविस्तर माहिती दिली. त्यानुसार मागील पाच वर्षांपासून समरवीर मालपाणी हेल्थ क्लब मध्ये जलतरण प्रशिक्षक आणि राष्ट्रीय जलतरणपटू अ‍ॅड. सदाशिवराव थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली नियमितपणे जलतरणाचा सराव करतो. तंदुरुस्तीसाठी हेल्थ क्लबचे प्रशिक्षक सचिन क्षीरसागर यांनीही त्याला विशेष प्रशिक्षण दिले.



जलतरणातील १४ वर्षांखालील जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय अशा दोन्हीही स्तरावरील कौशल्य चाचणीमध्ये समरवीरने उत्तम गुणांसह घवघवीत यश मिळविले. त्यामुळे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडानगरीतील क्रीडा प्रबोधिनी मध्ये इयत्ता आठवीच्या वर्गात त्याला थेट प्रवेश मिळाला. महाराष्ट्रातून जास्तीत जास्त अंतरराष्ट्रीय व ऑलिंपिक दर्जाचे खेळाडू घडवण्यासाठी राज्यातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करून त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण संतुलित आहार आणि अद्ययावत क्रीडा सुविधा पुरविण्याचे हेतूने पुणे येथे सुसज्ज क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात आलेली आहे.

आता इयत्ता आठवी ते बारावी पर्यंतचे शिक्षण त्याला या प्रबोधिनी मध्ये मिळेल. खेळाडूंच्या व्यक्तिशः प्रगतीवर प्रबोधिनी मध्ये विशेष लक्ष केंद्रित केले जाते. त्यामुळे भविष्यात त्याच्याकडून अपेक्षा आणखीन उंचावल्या आहेत.

*समरवीरच्या अभिमानास्पद कामगिरीबद्दल त्याचे अभिनंदन करून संगमनेर तालुका आणि अहिल्यानगर साठी भूषणावह ठरलेल्या या बाबीत मालपाणी हेल्थ क्लबचे योगदान असल्याचा सार्थ अभिमान असल्याची भावना मालपाणी उद्योग समूहाचे चेअरमन राजेश मालपाणी यांनी व्यक्त केली. श्री मालपाणी यांच्यासह मालपाणी हेल्थ क्लबचे सभासद,व्यवस्थापक, प्रशिक्षक आणि संगमनेर शहरातील सर्व क्रीडाप्रेमींनी समरवीरचे हार्दिक अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. समरवीर हा अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील विरगाव येथील स्वर्गीय मेजर शंकरराव थोरात यांचा यांचा पणतू आहे.

# विविध मुद्द्यांवर विरोधक सरकारला घेरणार, सोमवारपासून अधिवेशन

मुंबई (वृत्तसंस्था)

संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारपासून सुरू होणार आहे. या पावसाळी अधिवेशनात मोदी सरकार ३-३ घटनादुरुस्ती विधेयके सादर केली जाण्याची शक्यता आहे. मागच्या अधिवेशनचा अनुभव घेता यंदा पूर्ण तयारीनिशी घटनादुरुस्ती विधेयक सादर करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षही रणनिती आखण्यात व्यग्र आहे.

आगामी पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत काँग्रेस पक्षाची मोठी बैठक सुरू आहे. या बैठकीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित आहेत.काँग्रेसच्या बैठकीत मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासहित राहुल गांधी, प्रियंका गांधी, केसी वेणुगोपाल, शशी थरूर, पी. चिदंबरम, कुमारी शैलजा आणि मनीष तिवारी यांचा समावेश आहे.

या बैठकीत आगामी पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर चर्चा सुरू आहे. काँग्रेसच्या बैठकीत मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर चर्चा होत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मागच्या अधिवेशनात हे विधेयक रोखण्यात विरोधकांना यश आलं होतं. परंतु यंदा तृणमूल काँग्रेस, ठाकरे गटाचे खासदार फुटल्याने राजकीय समीकरणात बदल झाला आहे. तर या विधेयकासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी याच्या उपस्थितीत भाजपची देखील बैठक झाल्याचं कळतंय. पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानी अडीच तास बैठक झाली. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजप अध्यक्ष नितीन नवीन देखील उपस्थित होते. आता काँग्रेसची बैठक सुरू आहे.दरम्यान, मोदी सरकारला विधेयक मंजूर करण्यासाठी ३६० खासदारांची गरज भासणार आहे. सरकारकडे आतापर्यंत ३२४ खासदारांची संख्या झाली आहे. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीनेही काल पाठिंबा देण्याविषयी हिंट दिली.

५० टक्के सूत्रानुसार मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मांडल्यास पाठिंबा देण्याचा विचार करू, असं शरद पवारांच्या राष्ट्रवादीने सांगितले आहे. द्रमुक पक्षही या विधयेकावर सरकारला पाठिंबा देऊ शकतो. त्यामुळे आकडा ३५४ पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर वायएसआर आणि उद्धव ठाकरेंचे तीन खासदार एकत्र आल्यास मोदी सरकार मतदारसंघ पुर्नरचना विधयेक सहज मंजूर करू शकते.

# एलसीबीची मोठी कारवाई

## दोन सराईत आरोपी जेरबंद

### अकोलेतील दरोड्यासह १० गुन्ह्यांची उकल



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक कारवाई करत दरोडा, जबरी चोरी, घरफोडी तसेच मोक्का कायद्यातील गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या दोन सराईत आरोपींना जेरबंद केले आहे. या कारवाईमुळे अकोले तालुक्यातील गाजलेल्या दरोड्यासह एकूण १० गंभीर गुन्ह्यांची उकल झाली असून, या टोळीतील अन्य सात आरोपी अद्याप फरार आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अजय सादीश काळे (वय २४, रा. वाळुंज) व अक्षय उर्फ सोन्या अर्पण भोसले (वय २६, रा. घानेगाव, ता. पारनेर) यांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ मे २०२६ रोजी पहाटे अकोले तालुक्यातील औरंगपूर येथे अशोक केरू वाळुंज यांच्या घरात चार अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून घेतले. त्यानंतर घरातील कपाट फोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केली होती. या प्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि कसून तपासाच्या आधारे आरोपींचा माग काढला. १४ जुलै रोजी मुख्य आरोपी अजय काळे हा वाळकी येथे येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून अजय काळे व अक्षय उर्फ सोन्या भोसले यांना ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान दोघांनी अकोलेतील दरोड्यासह हा गुन्हा अन्य सात साथीदारांसोबत केल्याची कबुली दिली. तसेच चोरीतील सोन्या-चांदीचे दागिने किरण भाऊसाहेब बेंद्रे याला विकल्याची माहितीही पोलिसांना दिली. या गुन्ह्यातील गणेश भोसले, तुकाराम भोसले, बाळू भोसले, आशिष भोसले, शरद काळे, निकेश काळे, धिरज काळे तसेच चोरीचा मुद्देमाल खरेदी केल्याचा संशय असलेला किरण बेंद्रे हे अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. तपासादरम्यान मुख्य आरोपी अजय काळे हा दरोडा, जबरी चोरी, घरफोडी तसेच मोक्का कायद्यासह एकूण ११ गुन्ह्यांमध्ये फरार असल्याचे निष्पन्न झाले. तर अक्षय उर्फ सोन्या भोसले याच्याविरुद्धही दरोडा, घरफोडी व जबरी चोरीचे अनेक गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.


दोन्ही आरोपींकडे सखोल चौकशी केल्यानंतर पोलिसांनी अकोले, पारनेर, राहाता, लोणी, घारगाव, आश्वी आणि अहिल्यानगर तालुका परिसरातील एकूण १० गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळवले आहे.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

## आईलाही धमकी, आरोपी जेरबंद

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तालुक्याच्या ग्रामीण भागातील एका गावात अवघ्या १५ वर्ष वयाच्या अल्पवयीन मुलीला आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि. १५) रोजी पहाटे उघडकीस आली. मुलीचा शोध घेत घटनास्थळी पोहोचलेल्या आईने सदरचा धक्कादायक प्रकार पाहिल्यानंतर आरोपीला जाब विचारला असता त्याने उलट त्यांनाच दमदाटी करत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी संगमनेर शहर पोलिसांनी आरोपी गणेश चंद्रभान गायकवाड यांच्या विरोधात भारतीय न्यायसंहिता व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्यातील



कलमांनुसार गुन्हा दाखल करुन आरोपीला गजाआड केले आहे.

या प्रकरणातील पीडित मुलीच्या ३३ वर्षीय आईने दिलेल्या फिर्यादीनुसार बुधवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास संबंधित महिलेला जाग आली असता तिची १५ वर्षीय मुलगी बिछान्यावर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोध घेत असता घरालगतच्या शेतात मुलगी आणि आरोपी एकत्र दिसून आले. या प्रकाराचा जाब त्यांनी आरोपीला विचारला असता, त्याने आक्रमक भूमिका घेत पीडित मुलीला आईकडे जाऊ नकोस, तसेच कोण काय करते ते मी पाहतो अशा आशयाची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

संबंधित महिलेने संगमनेर शहर पोलीस ठाण्यात धाव घेत संपूर्ण प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन पीडितेचे जबाब, वैद्यकीय तपासणी आणि अन्य पुराव्यांच्या आधारे आरोपी गणेश चंद्रभान गायकवाड याच्याविरुद्ध कलम ६४, ३५१ (२) तसेच पोक्सो कायद्यातील कलम ४, ६, ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

# भेसळयुक्त अन्नाविरोधात AI चे हत्यार

## तुकाराम मुंढे यांचा मास्टरस्ट्रोक

मुंबई (वृत्तसंस्था)

अन्न आणि औषधांच्या सुरक्षिततेबाबत ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण अधिक प्रभावीपणे करण्यासाठी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. प्रशासनाने आता तक्रार नोंदवण्यासाठी एक अत्याधुनिक ऑनलाइन पोर्टल **(complaints.mahafda.in)** सुरू केले आहे. या पोर्टलचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

अनेकदा ग्राहकांना भेसळयुक्त अन्न किंवा निकृष्ट दर्जाच्या औषधांबाबत तक्रार करायची असते, परंतु ती कशी मांडावी, यात तांत्रिक अडचणी येतात. आता या नवीन प्रणालीमुळे ग्राहकांना केवळ बोलून आपली तक्रार नोंदवता येणार आहे. मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत आपली समस्या सांगितल्यास, एआय स्वतःहून ती तक्रार स्पष्ट आणि मुद्द्यांच्या स्वरूपात तयार करेल.

यामुळे तक्रारदारांचा वेळ वाचणार असून तक्रारीचे स्वरूप अधिक अचूक होणार आहे. या व्यासपीठावर अन्न सुरक्षा आणि औषध सुरक्षा या दोन्ही प्रकारच्या तक्रारी एकाच ठिकाणी करता येतील. ग्राहकांना आपली तक्रार सबमिट केल्यानंतर तिची सद्यस्थिती पाहण्याची सोयही उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रशासनाचा हा निर्णय जनसामान्यांच्या आरोग्याच्या



दृष्टीने एक महत्त्वाचा दिलासा मानला जात आहे.

**हे पोर्टल कसे वापराल?**

आता कोणताही नागरिक मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत बोलून भेसळयुक्त अन्न, बनावट किंवा निकृष्ट दर्जाची औषधे तसेच सार्वजनिक आरोग्याशी संबंधित कोणत्याही उल्लंघनाबाबत तक्रार नोंदवू शकतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता तक्रार आपोआप तयार करते, ती संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवते, विलंब झाल्यास स्वयंचलित एस्कलेशन करते आणि तक्रारीचा संपूर्ण प्रवास पारदर्शकपणे ट्रॅक करता येतो. नागरिकांचा सहभाग, तंत्रज्ञानाची ताकद आणि प्रशासनाची उत्तरदायित्व यांचा संगम घडवून सार्वजनिक आरोग्य संरक्षण अधिक प्रभावी करण्याचा हा प्रयत्न आहे. प्रत्येक तक्रार महत्त्वाची आहे, कारण प्रत्येक नागरिक महत्त्वाचा आहे. अन्न असो किंवा औषध, फक्त बोला - तक्रार आपोआप तयार होईल. भेसळयुक्त अन्नपदार्थ किंवा बनावट, निकृष्ट दर्जाच्या औषधांबाबत तक्रार नोंदवणे आता अत्यंत सोपे झाले आहे. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र शासनाच्या - ख-आधारित व्यासपीठावर मराठी, हिंदी किंवा इंग्रजीत बोला - तुमची तक्रार स्पष्ट व पूर्ण मुद्द्यांत आपोआप तयार होईल. अन्न सुरक्षा असो वा औषध सुरक्षा - दोन्ही तक्रारींसाठी एकच व्यासपीठ उपलब्ध आहे.

तक्रार नोंदवण्यासाठी: https://complaints.mahafda.in एका क्लिकवर तक्रार सबमिट करा आणि तिची स्थिती ट्रॅक करा.

# अगा पुंडलिका भेटी परब्रह्म आले...

अगा पुंडलिका भेटी परब्रह्म आले... हा वारकरी संप्रदायातील अत्यंत अर्थपूर्ण आणि भावस्पर्शी अभंग आहे. परब्रह्म पांडुरंग भक्त पुंडलिकाला भेटण्यासाठी का आले, याविषयी अनेक संत, विचारवंत आणि अभ्यासकांनी वेगवेगळ्या अंगांनी विवेचन केले आहे.

परमपूज्य पांडुरंगशास्त्री आठवले यांनी पांडुरंगाष्टकम्चे निरूपण करताना या प्रसंगाचा अत्यंत सुंदर अर्थ स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, भक्त पुंडलिकाच्या काळात समाजाचे जीवन अधःपतनाकडे झुकले होते. कर्मकांड वाढले होते, अंधश्रद्धा आणि मूर्खपणा पराकोटीला पोहोचला होता. अशा काळात समाजाला योग्य दिशा दाखविण्यासाठी पुंडलिकासारखा कर्तृत्ववान आणि कर्मयोगी पुरुष जन्माला आला.



पुंडलिकाने लोकांना सांगितले की, वृद्ध आई-वडील हेच साक्षात देवस्वरूप आहेत. त्यांच्या सेवेमध्येच परमेश्वराची खरी पूजा आहे. मातृदेवो भव, पितृदेवो भव हा वैदिक संदेश त्याने आपल्या आचरणातून समाजासमोर ठेवला. तो केवळ उपदेश करत नव्हता, तर स्वतः त्याचे पालन करत होता.

याच सेवेत तो इतका तल्लीन झाला होता की, प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण-पांडुरंग त्याला भेटण्यासाठी आले, तरी त्याने आपल्या कर्तव्यापासून विचलित होणे पसंत केले नाही. त्याने भगवानाला उभे राहण्यासाठी एक वीट दिली आणि आपल्या सेवेत मग्न राहिला. हे भगवानाचा अनादर नव्हते; उलट कर्तव्यनिष्ठेचा सर्वोच्च आदर्श होता. पुंडलिकाला हे पूर्णपणे माहीत होते की, स्वतः परब्रह्म त्याला भेटण्यासाठी आले आहेत. मात्र त्याच्या दृष्टीने आई-वडिलांची सेवा हीच त्या क्षणी सर्वोच्च ईश्वरसेवा होती.

भगवंत पुंडलिकाच्या या निष्काम कर्मयोगाने, त्याच्या नितळ भक्तीने आणि आंतरिक प्रेमाने भारावून गेले. म्हणूनच ते विटेवर उभे राहिले आणि त्या रूपातच आजचे विठ्ठल झाले. विशेष म्हणजे, विठ्ठलाच्या हातात कोणतेही शस्त्र नाही. तो अत्यंत साधा, सहज आणि सर्वसामान्यांना आपलासा वाटणारा देव आहे. म्हणूनच प्रत्येक भक्ताला विठ्ठल आपला वाटतो.

वारकरी पंढरीच्या वाटेवर चालताना प्रत्येक पावलावर विठ्ठलाचा अनुभव घेतो. हा विठ्ठल आणि संत यांचे नाते संत जनाबाईंनी अत्यंत सुंदर शब्दांत व्यक्त केले आहे-

**विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ।**
**निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।।**
**पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताबाई सुंदर ।**
**गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ।।**
**बंका कडियेवरी । नामा करंगुळी धरी ।**
**जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।**

या अभंगातून विठ्ठल हा आपल्या सर्व संतांना प्रेमाने जवळ घेणारा, भक्तवत्सल परमात्मा म्हणून उभा राहतो.

भक्त पुंडलिकाने आपल्या जीवनातून सेवा, कर्तव्यनिष्ठा आणि भक्ती यांचा अद्वितीय संगम घडवून आणला. त्याच्या निर्मळ मनात दुसरी कोणतीही प्रतिमा नव्हती-फक्त विठ्ठल आणि विठ्ठल. त्याने एकाग्र भक्तीचा मार्ग समाजाला दाखवून दिला.

आजही लाखो वारकरी आषाढी वारीत उन्हाची तमा न बाळगता, पाऊस-वारा सहन करत, देहभान विसरून पुंडलिक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम या अखंड गजरात पंढरीची वाट चालतात. त्यांच्या प्रत्येक पावलात भक्ती, सेवाभाव, समर्पण आणि एकाग्रता अनुभवास येते. हीच पुंडलिकाच्या कर्मयोगाची आणि विठ्ठलभक्तीची अखंड परंपरा आहे.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ४,३०० युवकांना कौशल्य प्रशिक्षण

मुंबई (वृत्तसंस्था)

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये येणाऱ्या लाखो भाविकांना उत्तम सेवा पुरवण्यासाठी आणि सोयी-सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. कुंभमेळ्यासाठी तब्बल ४ हजार उमेदवारांना पूर्वकौशल्य ज्ञान आणि ३०० उमेदवारांच्या अल्पमुदतीचे कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे.

जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने मुंबईत आयोजित विशेष सोहळ्यात या उपक्रमाला मंजुरी देण्यात आली. या योजनेमुळे हॉस्पिटॅलिटी, रिटेल, ऑटोमोबाईल, बांधकाम, आरोग्य सेवा आणि पर्यटन अशा प्रमुख क्षेत्रांसाठी प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळाची मोठी फळी कुंभमेळ्यासाठी सज्ज होणार आहे. एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूलच्या सेंट्रल हॉलमध्ये बुधवारी पार पडलेल्या या सोहळ्याला कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती होती. कुंभमेळ्यासारख्या जागतिक दर्जाच्या महासोहळ्यासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी सह्याद्री रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशन (नाशिक) यांना ४ हजार ३०० उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठीचे इरादा पत्र या प्रसंगी प्रदान करण्यात आले.

त्याशिवाय राज्यातील तरुणांना जागतिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी तीन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. 'सिड' संस्थेने '२ कॉम्स कन्सल्टिंग', 'बॉर्डर प्लस टेक्नॉलॉजी' आणि 'क्रेस इंटरनॅशनल सर्व्हिसेस' या जागतिक कंपन्यांसोबत भागीदारी केली आहे. या करारांमुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना परदेशात नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक असणारे भाषा प्रशिक्षण, प्रस्थानपूर्व प्रशिक्षण, व्हिसा व कागदपत्रांची पूर्तता, तसेच थेट प्लेसमेंटनंतरचे सर्व सहकार्य मिळणार आहेतसेच, जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने चालणाऱ्या 'दक्ष' प्रकल्पांतर्गत आयटीआयमधील निदेशकांसाठीच्या आधुनिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले. पहिल्या टप्प्यात राज्यातील २४० आयटीआय शिक्षकांना अ‍ॅडव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग, इलेक्ट्रिक व्हेईकल, सीएनसी मशीनिंग, रोबोटिक्स आणि एरोनॉटिकल फिटर यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाईल. याकामी 'महिंद्रा अँड महिंद्रा' आणि 'लार्सन अँड टुब्रो' या नामांकित उद्योगांनी सहकार्याचा हात पुढे केला आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्यूरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# रवी गिरी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या घुलेवाडी शहरप्रमुखपदी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे एकनिष्ठ व निष्ठावंत शिवसैनिक म्हणून ओळख असलेले रवी गिरी यांची पक्षाच्या घुलेवाडी शहरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली असून, त्यांच्या निवडीबद्दल घुलेवाडी परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



रवी गिरी हे गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनेशी एकनिष्ठ राहून पक्षाचे विचार व नेतृत्व यावर विश्वास ठेवून कार्यरत आहेत. शिवसेनेच्या अनेक चढ-उताराच्या काळात अनेकांनी पक्षाची साथ सोडली, मात्र रवी गिरी यांनी कायम उद्धव ठाकरे यांच्या विचारांशी बांधिलकी ठेवत पक्षासाठी प्रामाणिकपणे काम केले.

घुलेवाडी परिसरात सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.या नियुक्तीमुळे घुलेवाडी परिसरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला अधिक बळ मिळणार असल्याचे कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे.रवी गिरी यांच्या निवडीबद्दल घुलेवाडी ग्रामपंचायत, विविध संस्था, दूध संस्था, सहकारी सोसायटीचे पदाधिकारी, शिवसैनिक, कार्यकर्ते तसेच मित्र परिवाराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# अकोले तालुका शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुखपदी महेशराव नवले

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अकोले तालुकाप्रमुख पदावर महेशराव नवले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांच्या निष्ठा, संघटन कौशल्य आणि पक्षासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी गावागावांत कार्यकर्त्यांना एकत्र आणणे, पक्षवाढीसाठी सातत्याने प्रयत्न करणे आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी आवाज उठविण्याचे काम केले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर तालुक्याच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविली असल्याची भावना शिवसैनिकांकडून व्यक्त होत आहे.ज्ञत्यांच्या निवडीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महेशराव नवले यांनी या नियुक्तीबद्दल पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे, पक्षातील वरिष्ठ नेते आणि सर्व शिवसैनिकांचे आभार मानत, पक्षाने दिलेली जबाबदारी पूर्ण प्रामाणिकपणे पार पाडत अकोले तालुक्यात शिवसेना अधिक मजबूत करण्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

पान १ वरून

## संगमनेरात वाढत्या ...

मिळत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात गेलेल्या नागरिकांना अनेकदा अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचीही तक्रार काही नागरिकांकडून केली जाते. त्यामुळे अनेकजण तक्रार करण्यासही कचरत असल्याचे चित्र आहे. या परिस्थितीचा गैरफायदा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती घेत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी पोलीस प्रशासनाने नियमित गस्त, संशयित गुन्हेगारांवर कठोर कारवाई, अवैध धंद्यांवर विशेष मोहीम आणि सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे तसेच लोक प्रतिनिधींनीही वाढत्या गुन्हेगारीच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रशासनाशी समन्वय साधावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. श्रीरामपूरसारखी परिस्थिती संगमनेरमध्ये उद्भवू नये, यासाठी पोलीस यंत्रणा, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांनी संयुक्तपणे पुढाकार घेऊन गुन्हेगारीला आळा घालण्याची आवश्यकता असल्याचे मत विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. वाढत्या गुन्हेगारीवर वेळीच कठोर नियंत्रण न मिळाल्यास भविष्यात कायदा-सुव्यवस्थेचे मोठे आव्हान निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# बोटा गटात काँग्रेसला खिंडार ; युवक काँग्रेस महासचिवांसह कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील वरुडी पठार येथे काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला असून युवक काँग्रेसचे तालुका महासचिव सुमित फटांगरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळे बोटा गटात काँग्रेसला खिंडार पडले आहे या प्रवेशामुळे वरुडी पठार परिसरात महायुतीची ताकद अधिक बळकट झाली असून काँग्रेसच्या गोटात मात्र खळबळ उडाली आहे.

भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष शैलेश फटांगरे यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसचे तालुका महासचिव सुमित फटांगरे, वरुडी पठार तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष संतोष फटांगरे, माजी ग्रामपंचायत सदस्य भरत जाधव तसेच सामाजिक कार्यकर्ते अनिल फटांगरे यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी नव्याने पक्षात दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे आमदार खताळ यांनी स्वागत करत त्यांना पक्षाचा दुपट्टा परिधान करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना आमदार खताळ यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासाला प्राधान्य देणारे निर्णय घेतले जात आहेत. विकासाच्या या भूमिकेवर विश्वास ठेवून विविध पक्षांतील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर शिवसेनेत प्रवेश करत आहेत. वरुडी पठारातील कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे महायुतीची ताकद आणखी वाढणार असून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

शैलेश फटांगरे यांनीही यावेळी गावाच्या विकासासाठी पक्षसंघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनीही विकासाच्या राजकारणाला पाठिंबा देण्यासाठी शिवसेनेची वाट निवडल्याचे सांगितले. या पक्षप्रवेशामुळे बोटा गटातील राजकीय समीकरणांना नवी दिशा मिळणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून संगमनेर तालुक्यात विविध गावांतील पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत असून आमदार अमोल खताळ यांच्या नेतृत्वाखाली पक्षसंघटना दिवसेंदिवस अधिक मजबूत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# संस्कृत साहित्यातील सर्वोच्च मुकुटमणी म्हणजे महाकवी कालिदास : बी. टी. गुंजाळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संस्कृत भाषेच्या साहित्यातील सर्वोच्च मुकुटमणी म्हणजे महाकवी कालिदास होत. त्यांच्या साहित्याने भारतीय संस्कृती, निसर्गसौंदर्य, मानवी मूल्ये आणि काव्यपरंपरेला जागतिक स्तरावर अजरामर स्थान मिळवून दिले आहे, असे प्रतिपादन नवीन मराठी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक बी. टी. गुंजाळ सर यांनी केले.

आषाढ महिन्याच्या प्रारंभदिनी महाकवी कालिदास जयंतीनिमित्त विद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक शरमाळे सर होते. यावेळी भरीतकर सर व गायकवाड सर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात महाकवी कालिदास यांच्या प्रतिमेचे पूजनाने झाली. यानंतर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना कालिदास यांच्या साहित्यिक कार्याची ओळख करून देणारी मनोगते व्यक्त केली.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात गुंजाळ सर यांनी महाकवी कालिदास यांच्या जीवनकार्याचा सखोल आढावा घेतला. त्यांनी कालिदास यांच्या अभिज्ञानशाकुंतलम्, विक्रमोर्वशीयम्, मालविकाग्निमित्रम् या नाटकांसह रघुवंश, कुमारसंभव या महाकाव्यांचा तसेच मेघदूत आणि ऋतुसंहार या खंडकाव्यांचा अभ्यासपूर्ण परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. कालिदास यांच्या साहित्यामध्ये निसर्गाचे अप्रतिम चित्रण, संस्कृतीचे जतन, मानवी भावना आणि आदर्श जीवनमूल्यांचे दर्शन घडते. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही प्रेरणादायी व तितकेच समकालीन असल्याचे त्यांनी सांगितले. संस्कृत भाषा ही भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून विद्यार्थ्यांनी तिचा अभ्यास करून आपल्या सांस्कृतिक वारशाचे जतन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. महाकवी कालिदास यांच्या साहित्याचा अभ्यास विद्यार्थ्यांच्या विचारांना व्यापकता देतो तसेच भाषिक समृद्धी आणि सर्जनशीलतेला चालना देतो, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आव्हाड सर यांनी केले. गायकवाड सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## संसदेत स्मार्ट वॉच, स्मार्ट चष्म्यांना नो एन्ट्री

मुंबई (वृत्तसंस्था)

पावसाळी अधिवेशनापूर्वी लोकसभा सचिवालयाने खासदारांना महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत. स्मार्ट घड्याळे, स्मार्ट चष्मे, पेन कॅमेरे यांसारख्या अत्याधुनिक उपकरणांचा संसद परिसरात सुरक्षा, गोपनीयता किंवा संसदीय विशेषाधिकारांना बाधा पोहोचेल अशा पद्धतीने वापर करू नये, असे सचिवालयाने स्पष्ट केले आहे....तर गोपनीयतेचा होऊ शकतो भंगलोकसभा सचिवालयाने बुधवारी जारी केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे की, स्मार्ट घड्याळे, स्मार्ट चष्मे, पेन कॅमेरे तसेच रेकॉर्डिंगची क्षमता असलेली इतर आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणे आता सहज उपलब्ध आहेत. ही उपकरणे अनवधानाने किंवा जाणीवपूर्वक संवेदनशील माहितीची नोंद करू शकतात. त्यामुळे या उपकरणांचा गैरवापर झाल्यास खासदारांच्या गोपनीयतेचा भंग होऊ शकतो.

# संतांचे संगती... आत्मज्ञानाची प्रगती

# विठू झाला ज्यांचा सांगाती: संत जनाबाई

**विठोबाचा पशू मी जनी म्हणविते।**
**अखंड स्मरते नाम त्याचे।।**

वारकरी संप्रदायाच्या मंदिराचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला आणि नामदेवांनी विस्तार केला. पण या मंदिराच्या गाभाऱ्यात अखंड विठ्ठलमय होऊन राहिलेल्या माऊली म्हणजे संत जनाबाई. त्या केवळ दासी नव्हत्या, तर भक्तीच्या सम्राज्ञी होत्या. त्यांच्या प्रेमापोटी साक्षात विठ्ठलालाच त्यांची घरकामात मदत करावी लागली.



**जन्म आणि पंढरपुरातील जीवन**

जनाबाईंचा जन्म १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात, सुमारे १२७०-१२८० मध्ये परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथे झाला. वडील दमा आणि आई करुंड हे कट्टर विठ्ठलभक्त होते. लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरपल्यावर नामदेवांचे वडील दामाशेट्टी त्यांना पंढरपूरला घेऊन आले. तेव्हापासून त्या नामाची दासी जनी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

नामदेवांच्या घरी आल्यावर जनीने झाडलोट, दळण, भांडी, गोवऱ्या थापणे ही सर्व कामे विठ्ठलसेवा मानली. त्यांचा अहंकार पूर्णपणे विरघळला होता. म्हणूनच प्रत्येक अभंगाच्या शेवटी त्या दासी जनी म्हणे असे लिहायच्या. हा लाचारीचा नव्हे, तर शरणागतीचा अभिमान होता.

**भक्तीचे चमत्कार**

जनाबाईंची आर्त भक्ती पाहून विठ्ठल स्वतः त्यांचा सांगाती झाला.

१. दळणाचा सवंगडी: पहाटे दळण दळताना थकू नये म्हणून विठ्ठल जात्याची खुंटी धरायचा.

२. गोवऱ्यांचा साथीदार: गोवऱ्या थापायला गेल्यावर तो पाटी हातात घ्यायचा. जनी ज्या गोवऱ्या थापायची त्यातून विठ्ठल विठ्ठल असा नाद यायचा.

३. थंडीतील मदत: कडाक्याच्या थंडीत विठ्ठलाने स्वतः जनीचे कपडे धुतले, गरम पाणी केले आणि तेल लावून शेक दिला.

**शूळाचा चमत्कार**

एकदा गडबडीत विठ्ठल जनीचे घोंगडे पांघरून देवळात गेला आणि शेला- पदक जनीच्या झोपडीत राहिले. पुजाऱ्यांनी जनीवर चोरीचा आळ घेऊन तिला शूळाची शिक्षा दिली. चंद्रभागेच्या वाळवंटात जनीला नेले असता, जसा तिचा पाय शूळाला लागला तसा तो वितळून पाणी झाला. निसर्गानेच तिच्या पवित्रतेची साक्ष दिली.

**अभंगवाणी**

जनाबाई वारकरी संप्रदायातील थोर कवी होत्या. त्यांचे २५०-३५० अभंग आजही आहेत. त्यांची भाषा सोपी, घरगुती आणि थेट काळजाला भिडणारी आहे. त्या विठ्ठलाला कधी आई, कधी सखा, तर कधी लहान मूल मानून हक्काने बोलायच्या:

**ये गं ये गं विठूमाऊली।**
**तुझ्या पिल्लाची आली सावली।।**
**अरे विठ्या विठ्या, मूळच्या सुट्या।**

दळण, कांडण, चूल यांनाही त्यांनी अध्यात्माचा दर्जा दिला.

महानिर्वाण आणि वारसा

सुमारे १३५० मध्ये संत नामदेवांसोबतच जनाबाईंनीही पंढरपूर येथे देह ठेवला. आजही पंढरपूरच्या महाद्वाराच्या पायरीपाशी असलेल्या त्यांच्या स्मृतीला वारीतील प्रत्येक वारकरी नतमस्तक होतो.

संदेश: जनाबाईंचे चरित्र म्हणजे कष्ट, भक्ती आणि अथांग प्रेमाचे प्रतीक आहे. जेव्हा जीव देवाशी एकरूप होतो, तेव्हा देवाला त्याचे दास्यत्व पत्करावे लागते.

**संत शिरोमणी माऊली संत जनाबाई की जय ! पुंडलिक वरदे हरी विठ्ठल !**



**संकलन, संतचरणरज...**
**श्री. सदाशिव रामनाथ मुळे**
(पुणे युवावार्ता, प्रतिनिधी), मो . ८६६८३२७१७४
सौजन्य - निजध्यास...

# आरटीओ कार्यालयामुळे नागरीकांना मिळणारा मोठा दिलासा - काळे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर आणि अकोले तालुक्यातील नागरिकांची परिवहन सेवांसंदर्भात वर्षानुवर्षांपासून होणारी परवड आता थांबणार आहे. या दोन्ही तालुक्यांतील नागरिकांना आरटीओशी संबंधित कामांसाठी लांबचा प्रवास करावा लागू नये आणि ही कामे स्थानिक पातळीवरच सुलभतेने व्हावीत, यासाठी संगमनेरमध्ये स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) मंजूर व्हावे म्हणून आमदार अमोल खताळ हे सातत्याने पाठपुरावा करत होते. राज्याचे परिवहन मंत्री नामदार प्रतापराव सरनाईक यांच्याकडे केलेल्या या प्रामाणिक प्रयत्नांना अखेर मोठे यश आले असून, संगमनेरमध्ये लवकरच उपप्रादेशिक परिवहन कार्यालय साकारणार आहे.

आमदार अमोल खताळ यांच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल शिवसेना (शिंदे गट) उप जिल्हाप्रमुख रमेश काळे यांनी त्यांचे जाहीर कौतुक करत विरोधकांवर जोरदार निशाणा साधला आहे. जे गेल्या ४० वर्षांत विरोधकांना जमले नाही, ते आमदार अमोल खताळ यांनी अवघ्या दीड वर्षात करून दाखवले, अशा शब्दांत काळे यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

संगमनेर आणि शेजारील डोंगराळ अकोले तालुक्यातील नागरिकांना वाहन परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), वाहन नोंदणी, पासिंग व आरटीओशी संबंधित इतर कामांसाठी जिल्हा. पातळीवर हेलपाटे मारावे लागत होते. यामध्ये सामान्य नागरिक, शेतकरी आणि वाहनधारकांचा मोठा वेळ आणि पैसा वाया जात होता. हीच अडचण ओळखून आमदार अमोल खताळ यांनी पदभार स्वीकारल्यापासून या विषयाचा सरकार दरबारी अत्यंत प्रभावीपणे पाठपुरावा केला. परिवहन मंत्र्यांकडे सातत्याने केलेल्या बैठका आणि निवेदनांमुळे अखेर या कार्यालयाचा मार्ग मोकळा झाला आहे.



या महत्त्वाकांक्षी निर्णयाचे स्वागत करताना शिवसेनेचे उप जिल्हाप्रमुख रमेश काळे म्हणाले, संगमनेर मतदारसंघावर ज्यांनी तब्बल ४० वर्षे एकछत्री सत्ता होती त्यांना येथील जनतेच्या साध्या आणि मूलभूत गरजा कधीच पूर्ण करता आल्या नाहीत. मात्र, कार्यक्षम नेतृत्व म्हणून पुढे आलेल्या आमदार अमोल खताळ यांनी कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता, केवळ दीड वर्षांच्या अल्पावधीत संगमनेरसाठी आरटीओ कार्यालय मंजूर करून आणले. आमदार खताळ यांच्या विकासकामांच्या झंझावातामुळे विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. संगमनेरमध्ये स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होणार असल्याच्या वृत्ताने तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. यामुळे वाहन चालक, व्यावसायिक, तरुण वर्ग आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठी सोय होणार असून आमदार अमोल खताळ यांच्या कार्यतत्परतेचे व रमेश काळे यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## संपादकीय...

# कौशल्य विकास की बेरोजगारीची थट्टा?

केंद्र व महाराष्ट्र राज्याच्या राजधानीपासून शेकडो कोस दूर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील मागास व गरीब कुटुंबातील युवावर्गास असले कौशल्य विकास भकासच करणारे ठरत आहे. कारण येथील तरुणाई स्वबळावर किंवा स्वतःचे भांडवल जमवून उद्योग सुरू करू शकत नाही. जरी बँककर्ज काढून किंवा शासनाच्या अनुदानाच्या भरवशावर उद्योग थाटलाही, तरी मात्र त्याची ती दुकानदारी अल्पावधीतच गारद होईल. विचारा तर खरं, का बरं? म्हणून... अहो, येथे त्या योग्य ग्राहकसंख्याच बोटावर मोजण्याइतकी आहे, मग काय माशा मारणार की काय? हे फक्त सुशिक्षित बेरोजगारांच्या जखमांवर मीठ चोळल्यासारखे झाले. हीच तर खरी अडचण आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांत कर्मचाऱ्यांच्या रिक्तपदांचा उत्तुंग डोंगर उंचच उंच वाढतच आहे. त्यात भरतीप्रक्रिया राबविल्यास कित्ती बरे होईल, बिच्चारी मागास भागातील सुशिक्षित बेरोजगार तरूणाई पोटापाण्याला लागेल. काही पदांची भरती घेतल्या जाते, मात्र मंत्री, पदाधिकारी व अधिकारी टेबलाखालूनच्या वशिलेबाजीला प्रथम स्थान देतात. त्यातही बिच्चारा हा भुकेकंगाल युवावर्ग मागे पडतो, हीच आजची फार मोठी शोकांतिका! दरवर्षी साजरा होणारा जागतिक युवा कौशल्य दिन तरुणांना रोजगारासाठी, उद्योजकता बनण्यासाठी प्रोत्साहन देतो. तो तरूणाईच्या अंगी असावे लागणारे कौशल्य सुसज्ज करण्याच्या महत्त्वावर लक्ष केंद्रित करतो. स्किल इंडिया मिशन देखील याच दिवशी सुरू करण्यात आले आहे. जागतिक युवा कौशल्य दिवस हा तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण-प्रशिक्षणाचे महत्त्व, स्थानिक आणि जागतिक अर्थव्यवस्थेशी संबंधित आहे. या संबंधित कौशल्यासह इतर कौशल्यांच्या विकासाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा दिवस १५ जुलै रोजी साजरा केला जातो. तरुणांना रोजगार, योग्य काम आणि उद्योजकता या कौशल्यांनी सुसज्ज करणे गरजेचे आहे. हा दिवस वर्तमान आणि भविष्यातील जागतिक आव्हाने सोडविण्यासाठी कुशल तरुणांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर देखील प्रकाश टाकतो. हा दिवस तरूणामधील संवाद, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण-प्रशिक्षण संस्था, कंपन्या, नियोक्ते इत्यादींसाठी एक खास संधी प्रदान करतो. भारतातील स्किल इंडिया मिशन देखील या दिवशी सुरू करण्यात आले आहे. स्किल इंडिया हा केंद्र सरकारचा एक पुढाकार आहे, जो युवा कौशल्याचे सबलीकरण करण्यासाठी व त्यांना अधिक रोजगारक्षम बनवण्यासाठी सुरू केलेला आहे. पण रोजगार कुठे आहे हो? संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना- युनेस्को यांनी जाहीर केलेल्या एका आकडेवारीनुसार जगातील ७० टक्के विद्यार्थी लॉकडाउनमुळे वाईट रीतीने प्रभावित झाले आहेत. अनेक विद्यार्थी ऑनलाइन शिक्षण सुरु झाल्यामुळे साधनांच्या अभावाने शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. कोविड-१९ या साथीच्या आजारामुळे सद्या ६ पैकी १हून अधिक तरुण कामावर जात नाहीत. अशावेळी जेव्हा तरुणांना रिकव्हरीच्या प्रयत्नास हातभार लावण्याचे आवाहन केले जाते, तेव्हा त्यांना पुढे असलेल्या आव्हानांना यशस्वीरित्या बाजूला करण्यासाठी त्यांना कौशल्यांनी सुसज्ज करणे आवश्यक आहे. जीवघेण्या कोरोना महामारीनंतर युवा कौशल्यावर नवीन विचार करणे गरजेचे आहे. डिसेंबर २०१४मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने ठराव स्वीकारून १५ जुलै हा जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून घोषित केला. आजच्या तरूणांसाठी बेरोजगारी आणि रोजगाराच्या आव्हानांच्या बाबतीत अधिक चांगली सामाजिक-आर्थिक परिस्थिती प्राप्त करणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त सन २०२० साली रोटरी क्लब ऑफ बॉम्बेतर्फे प्रशिक्षणार्थींना मोबाईल टॅबलेट वितरणाचा ई-शुभारंभ केला होता. महाराष्ट्रामध्ये दरवर्षी जागतिक युवा कौशल्य दिन- वर्ल्ड युथ स्किल्स डे साजरा करण्यात येत असतो. त्यावेळी विविध ऑनलाईन कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात. सर्वात महत्वाचे म्हणजे दोन वर्षांपूर्वी या दिवसाचे औचित्य साधून सलाम बॉम्बे फाऊंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बेच्या वतीने प्रशिक्षणार्थींना मोबाईल टॅबलेट वितरणाचा ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला होता. त्याचबरोबर स्किल डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या वतीने ऑनलाईन वेबिनार तसेच कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत फेसबुक आणि युट्यूब लाईव्हद्वारे राज्यभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला होता. कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांना विविध कौशल्य प्रशिक्षणे ऑनलाईन साधनांच्या आधारे देण्याचा मानस त्यावेळी कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक साहेब यांनी व्यक्त केला होता. सलाम बॉम्बे फाऊंडेशनमार्फत गरीब विद्यार्थी आणि बेरोजगार तरुणांसाठी ब्युटी आणि वेलनेस, विविध घरगुती उपयोगाच्या वस्तुंची दुरुस्ती, मोबाईल रिपेरिंग, बेकरी उत्पादने, ज्वेलरी डिझाईन, माध्यमे, करमणूक आणि क्रीडाविषयक अशी विविध कौशल्य प्रशिक्षणे दिली जातात. काळवेळ पाहून विद्यार्थ्यांना ही प्रशिक्षणे ऑनलाईन दिली जातात. या प्रशिक्षणासाठी ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाईल फोन नाही, अशा विद्यार्थ्यांना मदत व्हावी; यासाठी रोटरी क्लब ऑफ बॉम्बेमार्फत विद्यार्थ्यांना टॅबलेट देण्यात येतात. यासोबतच सांगली येथील स्किल डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्यामार्फत राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन वेबिनार संपन्न झाला. दुपारी कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत झालेल्या फेसबुक आणि युट्यूब लाईव्हमध्ये प्रशिक्षणार्थी व संस्थांचा ऑनलाईन गौरव करण्यात आला होता.

# वाढदिवसानिमित्त केक नव्हे, घोरपडीला जीवनदान सर्पमित्र श्याम कोळपकर यांचा अनोखा उपक्रम



युवावार्ता(प्रतिनिधी) -

संगमनेर- वाढदिवस संस्मरणीय करण्यासाठी केक कापण्याऐवजी दुर्मीळ वन्यजीवाला जीवनदान देत सर्पमित्र श्याम कोळपकर यांनी अनोखा आदर्श घालून दिला. वाडेकर गल्लीतील एका घरात शिरलेल्या सुमारे साडेतीन फूट लांबीच्या घोरपडीचे (गोह) त्यांनी सुरक्षितपणे रेस्क्यू केले.

घोरपडीची एक दिवस काळजी घेत तिला अन्न व पाण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी खांडगाव येथील कपारेश्वर मंदिराजवळील नैसर्गिक अधिवासात असलेल्या तलाव परिसरात तिला सुरक्षितरीत्या सोडण्यात आले. यावेळी संजय क्षत्रिय आणि जान्हवी कोळपकर उपस्थित होते. यावेळी श्याम कोळपकर यांनी सांगितले की, घोरपड हा पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाचा सरपटणारा वन्यजीव आहे. शेत आणि जंगल परिसरात उंदीर, अंडी तसेच लहान जीवांवर उपजीविका करून ती नैसर्गिक अन्नसाखळीचे संतुलन राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावते. घोरपडीचा प्रजनन कालावधी जुलै ते सप्टेंबरदरम्यान असल्याने या काळात तिचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. घोरपडीबाबत समाजात अनेक अंधश्रद्धा आणि गैरसमज पसरलेले आहेत. प्रत्यक्षात हा प्राणी विनाकारण माणसांवर हल्ला करत नाही. इतिहासातही घोरपडीच्या उपयोगाचा उल्लेख आढळतो, असे त्यांनी सांगितले.

वन्यजीवांची खरेदी-विक्री करणे किंवा त्यांना इजा पोहोचविण्याऐवजी त्यांना सुरक्षित नैसर्गिक अधिवासात सोडावे, असे आवाहन श्याम कोळपकर यांनी केले. वन्यजीव ही देशाची अमूल्य नैसर्गिक संपत्ती असून त्यांचे संवर्धन आणि संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

# राज्यभरात २० जुलैपासून पावसाचा जोर वाढणार

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेला मान्सून आता पुन्हा एकदा सक्रिय झाला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, येत्या २० जुलैपासून महाराष्ट्रातील विविध भागांत पुन्हा एकदा मुसळधार पावसाला सुरुवात होणार आहे. सध्या उत्तर बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्याने पावसासाठी अत्यंत पोषक वातावरण तयार झाले असून, राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पावसाच्या या पुनरागमनामुळे बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे.

हवामान विभागाने आज सोलापूर, धाराशिव आणि कोकणातील काही भागांसाठी पावसाचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. यासोबतच कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पावसामुळे वातावरणातील उकाडा कमी झाला असून, पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिकांना यामुळे जीवदान मिळणार आहे.सध्या देहरादून, पाटणा आणि बांकुरा या भागात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. तसेच, बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशात समुद्रसपाटीपासून ९०० किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत.

# अमृत उद्योजकता विकास कार्यक्रमातून लाभार्थ्यांना व्यवसायाच्या संधींची माहिती

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)च्या अहिल्यानगर जिल्हा कार्यालयात 'अमृत उद्योजकता विकास कार्यक्रम' प्रशिक्षणास उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. अमृत संस्थेचे विभागीय व्यवस्थापक प्रथमेश कुलकर्णी यांच्या हस्ते तसेच टी.जे.एस.बी. बँकेचे शाखाधिकारी राहुल पटवेकर आणि जनता सहकारी बँकेचे सहाय्यक शाखाधिकारी मिलिंद भणगे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी अमृत मित्र वैभव कुलकर्णी, अमृत सखी गौरी कुलकर्णी तसेच सुजल झुंजारे उपस्थित होते.

प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी विभागीय व्यवस्थापक प्रथमेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात अमृत संस्थेच्या विविध योजनांची माहिती देत उद्योजकता विकासासाठी प्रशिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. टी.जे.एस.बी. बँकेचे शाखाधिकारी राहुल पटवेकर यांनी बँक कर्ज प्रस्ताव, आवश्यक कागदपत्रे, विविध प्रकारची कर्जे, कर्ज मंजुरी प्रक्रिया तसेच बँकिंग व्यवहारांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. जनता सहकारी बँकेचे सहाय्यक शाखाधिकारी मिलिंद भणगे यांनीही लाभार्थ्यांना बँकिंग क्षेत्राशी संबंधित महत्त्वपूर्ण माहिती दिली. प्रशिक्षणादरम्यान लाभार्थ्यांनी बँकिंग आणि कर्ज प्रक्रियेशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित केले. मान्यवरांनी त्यांच्या शंकांचे समाधानकारक निरसन केले. त्यामुळे सहभागी लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. प्रशिक्षणाच्या समारोपावेळी जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

प्रशिक्षणात एकूण १५ लाभार्थ्यांनी सहभाग नोंदविला. अमृत ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून, शासनाच्या इतर महामंडळांचा लाभ न मिळणाऱ्या खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांसाठी विविध स्वयंरोजगार, उद्योजकता व आर्थिक सक्षमीकरणाच्या योजना राबविते. वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या पात्र व्यक्तींना संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेता येतो.

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत अमृतची कार्यालये कार्यरत असून, अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी **https://mahaamrut.org.in** या संकेतस्थळास भेट द्यावी अथवा ९११२२२८७६९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

पान १ वरून -

## जलजीवन मिशनच्या ...

पठार भागातील अनेक गावांच्या हद्दीत जलजीवन मिशनचे पाइप साठवून ठेवले आहेत. मध्यरात्री एवढ्या मोठ्या प्रमाणात पाइप भरले जात असल्याचे लक्षात येताच आम्ही तातडीने माहिती दिली. ग्रामस्थांनी एकजुटीने धाव घेतल्यामुळे ही मोठी चोरी उधळून लावता आली.

नामदेव खुले, सरपंच, सावरगाव धुळे म्हणाले, पिंपळगाव खांड धरणातून पाणीपुरवठा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाइप आणून ठेवण्यात आले आहेत. मंगळवारी रात्री अज्ञात व्यक्ती टेम्पोमध्ये पाइप भरत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. ग्रामस्थ येत असल्याचे पाहताच चोरटे पसार झाले. मात्र, वरुडी फाट्यावर टेम्पो अडवून चालकाला पकडण्यात यश आले. आता फरार आरोपींनाही तातडीने अटक करून अशा प्रकारांना आळा घालण्याची गरज आहे.


दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
०२४२५ – २२५१२९

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com — दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५५८/२०२६ — दिनांक – २४/०६/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. भिमाबाई धोंडीबा शिंगोटे रा. कोकणगांव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक १४/०५/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. कोकणगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची आजोबा स्वत: नामे भिमाबाई धोंडीबा शिंगोटे यांचा **जन्म मौजे कोकणगांव-शिवापूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०१/०६/१९५९** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, कोकणगाव-शिवापूर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, कोकणगांव-शिवापूर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com — दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५७८/२०२६ — दिनांक – २४/०६/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री.मुनीर कादर शेख, रा. तळेगाव दिघे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक १६/०४/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. तळेगाव दिघे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे मुनीर कादरभाई शेख यांचा **जन्म मौजे तळेगाव दिघे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०१/०६/१९७३** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, तळेगाव दिघे यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, तळेगाव दिघे यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**पाहिजेत**
नामांकित व्हॅल्युएशन फर्ममध्ये पुरुष पाहिजेत
पुरुष- 02 जागा
इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा
9860565356

**पाहिजेत**
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
– संपर्क –
8888808397

**पाहिजेत**
मॉम-एबल फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटर, संगमनेर
आरएमओ (महिला) – १
शैक्षणिक पात्रता : BAMS / BHMS
नर्सिंग स्टाफ (रात्रपाळी) – १
हाऊसकीपिंग मावशी – २
घर कामासाठी मावशी – १
(सकाळी ९ ते सायंकाळी ५)
— संपर्क —
9860477807

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

**पाहिजेत**
हिशोब करण्याकरिता दोन मुले पाहिजे
(कॉम्प्युटर येणे आवश्यक)
ए. जी. एस. टोमॅटो सप्लायर्स
टोमॅटो मार्केट यार्ड, संगमनेर
दुकान क्रमांक : १२३४५
7741816770
9763531663

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर – ०२
ड्रायव्हर – ०१
सेल्समन – ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर )
अकाउंटट - २ (टॅली)
कॅाम्प्युटर ऑपरेटर -२ पदवीधर
डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर
9822791484
9518556933
9370017177

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050








# धबधब्यावर धिंगाणा; वनमजुराला पर्यटकांकडून बेदम मारहाण

## म्युझिक सिस्टिम बंद करण्यास सांगितल्याचा राग; रुग्णवाहिकेतील तलवारही जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - कळसुबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्यातील न्हाणी धबधबा परिसरात साउंडसिस्टिम बंद करण्यास सांगितल्याचा राग मनात धरून मद्यधुंद पर्यटकांच्या टोळक्याने रोजंदारीवरील वनमजुराला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. या मारहाणीत वनमजूर गंभीर जखमी झाला असून, मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या त्याच्या मित्रालाही मारहाण करण्यात आली. विशेष म्हणजे, संबंधित पर्यटकांच्या रुग्णवाहिकेच्या झडतीदरम्यान एक धारदार तलवारही जप्त करण्यात आली आहे.

कळसुबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्याच्या भंडारदरा वनपरिक्षेत्रातील न्हाणी धबधबा परिसरात पावसाळी पर्यटनासाठी पर्यटकांना मुतखेल व शेंडी वन तपासणी नाक्यांवरून ठरावीक अटी-शर्तींवर प्रवेश दिला जातो. वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने येथे साउंडसिस्टिम वाजविणे, मद्यप्राशन करणे व धिंगाणा घालण्यास कायद्याने सक्त मनाई आहे.

माञ, मनमाड येथून रुग्णवाहिकेत आलेल्या काही तरुणांनी धबधब्याजवळील वाहनतळावर मोठ्या आवाजात साउंडसिस्टिम लावून मद्यधुंद अवस्थेत नाचण्यास सुरुवात केली. यावेळी तेथे कर्तव्यावर असलेले रोजंदारीवरील वनमजूर किशोर बुळे (वय २१, रा. कोलटेंभे) यांनी त्यांना नियमांचे

छाया – विलास तुपे, राजूर



पालन करण्यास सांगत साउंडसिस्टिम बंद करण्यास सांगितले.

याचा राग आल्याने संशयित अमित बगाडे याने हातातील लोखंडी कड्याने किशोर बुळे यांच्या चेहऱ्यावर जोरदार प्रहार केला. त्यानंतर टोळक्याने त्यांना बेदम मारहाण केली. मध्यस्थी करण्यासाठी धावलेल्या सोमनाथ बुळे यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. मारहाणीत किशोर बुळे रक्तबंबाळ होऊन बेशुद्ध पडल्याने परिसरातील अन्य पर्यटकांनी धाव घेत त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविले. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे गस्तीपथक घटनास्थळी दाखल झाले. जखमी वनमजुराला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, आरोपी ज्या एमएच-१५ जेसी-८२६१ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेत आले होते, तिची झडती घेतली असता त्यामध्ये एक धारदार तलवार आढळून आली. वनकर्मचाऱ्यांनी ती जप्त करून राजूर पोलिसांच्या ताब्यात दिली. याप्रकरणी अमित बगाडे, प्रशांत बहोत, जुनेद शेख, विक्रांत बहोत, उबेद खान, अभिषेक बहोत, सागर वाघ, हर्षवर्धन बहोत व श्रीकांत बहोत (सर्व रा. मनमाड) यांच्याविरुद्ध राजूर पोलिस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पो. निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी श्रीकांत नरोडे, संभाजी सांगळे, जाधव व मुठे करीत आहेत.

## ११५ कोटींच्या मालमत्तेवर शासनाचे जप्तीचे आदेश

युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर -

जिल्ह्यातील हजारो गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचा आरोप असलेल्या बहुचर्चित सिस्पे, इनफिनाईट बिकन व तत्सम कंपन्यांच्या आर्थिक घोटाळा प्रकरणातील ११४ कोटी ९३ लाख रूपयांच्या मालमत्तेच्या जप्तीच्या एमपीआयडी (महाराष्ट्र ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण अधिनियम) प्रस्तावाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. शासनाच्या आदेशानंतर संबंधित बँक खाती, शेअर बाजारातील डिमॅट खाती आणि स्थावर मालमत्तेवर शासनाचा ताबा आला असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. या प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने तपासादरम्यान कंपनी, तिचे संचालक, एजंट आणि संबंधितांच्या नावावरील मालमत्तेचा शोध घेतला. त्यामध्ये ११३ कोटी ३८ लाख रूपयांची बँक व डिमॅट खात्यांतील रक्कम तसेच एक कोटी ५५ लाख रूपयांची स्थावर मालमत्ता आढळून आली. या सर्वांचा समावेश असलेला ११४ कोटी ९३ लाख रूपयांचा एमपीआयडी प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. शासनाने या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर संबंधित मालमत्तांवर जप्तीची प्रक्रिया लागू झाली आहे. या मालमत्तेचे व्यवस्थापन आणि पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी श्रीगोंदा-पारनेर विभागाचे उपविभागीय दंडाधिकारी (प्रांत अधिकारी) यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या देखरेखीखाली जप्त केलेल्या रोख रकमेबाबत व स्थावर मालमत्तेबाबत पुढील प्रक्रिया पार पडणार आहे.

# फसवणूक व दमदाटीला कंटाळून ज्येष्ठाची आत्महत्या

## दोन महिलांविरुध्द गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

समनापूर - हात उसने दिलेले पैसे परत मागितल्यावर दमदाटी व मारहाण करून मानसिक छळ केल्याच्या प्रकाराला कंटाळून एका ज्येष्ठाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना संगमनेर तालुक्यातील समनापूर येथे उघडकीस आली आहे. या घटनेमुळे शहरासह ग्रामीण भागात एकच खळबळ उडाली असून, पोलिसांनी या प्रकरणी दोन महिला आरोपींना अटक केली आहे. नामदेव लहुजी गायकवाड (वय ६५, रा. समनापूर) असे आत्महत्या केलेल्या ज्येष्ठाचे नाव आहे.

मयत नामदेव गायकवाड यांच्याकडून आरोपी महिलांनी टप्प्याटप्प्याने १० हजार रुपये हात उसने म्हणून घेतले होते. पैसे परत मागितल्यावर आरोपींनी पैसे देण्यास नकार देत वारंवार दमदाटी, शिवीगाळ केल्याचे मयत गायकवाड यांनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीत म्हटले आहे. या मानसिक छळाला कंटाळून नामदेव गायकवाड यांनी आपल्या मृत्यूनंतर पुरावा




एआय फोटो

म्हणून वापरता यावा, या उद्देशाने लेखी मजकूर तयार करून ठेवला होता. त्यामध्ये आरोपींच्या त्रासामुळे आपण टोकाचे पाऊल उचलत असल्याचा उल्लेख असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

याप्रकरणी ज्ञानदेव लहूजी गायकवाड (रा. गणेशनगर, समनापूर, ता. संगमनेर) यांच्या फिर्यादीवरून संबंधित दोन महिलांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०८, ३५१ (२), ३ (५) तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही महिला आरोपींना अटक करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक समीर बारवकर, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत, यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विकास ढोकरे करीत आहेत.

## घारगावमध्ये केमिकलयुक्त ताडीच्या अड्ड्यावर धाड; २२० लिटर साठा नष्ट

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्याच्या पठार भागातील घारगाव येथे गेल्या अनेक वर्षांपासून राजरोसपणे सुरू असलेल्या केमिकलयुक्त ताडी विक्रीच्या अड्ड्यावर संगमनेर येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने मंगळवारी (दि. १४ जुलै) रोजी सकाळी छापा टाकून कारवाई केली. पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या एका फिटनेस क्लबच्या पाठीमागील पत्र्याच्या शेडमध्ये हा काळा धंदा सुरू होता. या कारवाईत पथकाने तब्बल २२० लिटर केमिकलयुक्त ताडीचा मोठा साठा हस्तगत करून तो जागेवरच नष्ट केला आहे. याप्रकरणी सुनीता गुत्तेदार (वय ४४, रा. घारगाव) या महिला आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक योगेश सावखेडकर, उपनिरीक्षक गोकुळ नायकोडी, महिला जवान स्वाती फटांगरे, सरस्वती वराट, जवान दत्ता खाडे आणि विपुल कर्पे यांच्या पथकाने ही धडक कारवाई केली. विशेष म्हणजे, नोव्हेंबर २०२५ च्या ग्रामसभेत घारगावमधील अनधिकृत ताडी विक्री केंद्र, गावठी दारूचे अड्डे आणि इतर अवैध व्यवसाय बंद करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला मध्येही उत्पादन शुल्क विभागाने याच अड्ड्यावर छापा टाकून मुद्देमाल नष्ट केला होता. संशयित आरोपी सुनीता गुत्तेदार हिच्यावर मागील वर्षभरात चार गुन्हे दाखल असून, उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे तिच्याकडून एक लाख रुपयांचे बंधपत्रही लिहून घेण्यात आले होते. माञ, तरीही हा अवैध व्यवसाय पुन्हा सुरूच राहिल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. वारंवार गुन्हे करणाऱ्या य आरोपीवर आता थेट 'मकोका' अंतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी घारगावमधील नागरिकांनी केली आहे.

## दिनविशेष

१९९६: चेन्नई — मद्रास शहराचे अधिकृतपणे चेन्नई असे नामकरण करण्यात आले
१९७६: ऑलिम्पिकस् — २१व्या स्पर्धांना कॅनडा देशात सुरवात.
१९७५: — अमेरिकेचे अपोलो आणि रशियाचे सोयुझ ही दोन अंतराळयाने एकमेकांस जोडली गेली.
१९५५: डिस्नेलँड, कॅलिफोर्निया — सुरू.
१९४७: — मुंबई ते रेवस जलवाहतूक करणाऱ्या रामदास या फेरीबोटीला जलसमाधी मिळून सुमारे ७०० लोक मृत्युमुखी.
१८४१: — सुप्रसिद्ध पंच या विनोदी साप्ताहिकाचा पहिला अंक प्रकाशित.
१८०२: — मोडी लिपीतून पहिल्यांदाच मुद्रण करण्यात आले.

## जन्म

१९५४: अँजेला मेर्केल — जर्मनीच्या चॅन्सेलर
१९३०: बाबूराव बागूल — दलित साहित्यिक (निधन: २६ मार्च २००८ )
१९२७: प्रोस्पेर इगो — औड-स्ट्रिजडर्स लेगिओनचे संस्थापक, डच कार्यकर्ते (निधन: २३ जानेवारी २०१५ )
१९२३: जॉन कूपर — कूपर कार कंपनीचे सहसंस्थापक (निधन: २४ डिसेंबर २००० )
१९२१: लुई लाचेनल — अन्नपूर्णा १ शिखर पहिल्यांदा मॉरिस हेर्झोग यांच्यासोबत सर करणारे फ्रेंच गिर्यारोहक (निधन: २५ नोव्हेंबर १९५५ )
१९२०: गॉर्डन गूल्ड — लेसरचे शोधक (निधन: १६ सप्टेंबर २००५ )
१९१९: स्नेहल भाटकर — संगीतकार (निधन: २९ मे २००७ )
१९१८: कार्लोसमनुएल अराना ओसोरिया — ग्वाटेमालाचा राष्ट्राध्यक्ष
१९१७: बिजोन भट्टाचार्य — भारतीय अभिनेते, गायक आणि पटकथालेखक (निधन: १९ जानेवारी १९७८ )
१८८९: अर्लस्टॅनले गार्डनर — अमेरिकन लेखक (निधन: ११ मार्च १९७० )

## मृत्यू

२०२०: सी.एस. शेषाद्री — भारतीय गणितज्ञ व चेन्नई मॅथेमॅटिकल इन्स्टिट्यूटचे संस्थापक — पद्म भूषण, शांती स्वरूप भटनागर पुरस्कार (जन्म: २९ फेब्रुवारी १९३२ )
२०१२: मृणाल गोरे — समाजवादी नेत्या (जन्म: २४ जून १९२८ )
२०१२: मार्शा सिंह — भारतीय-इंग्रजी राजकारणी (जन्म: ११ ऑक्टोबर १९५४ )
२००५: सर एडवर्ड हीथ — युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान
२००३: वॉल्टर झाप — मिनॉक्सचे शोधक (जन्म: ४ सप्टेंबर १९०५ )
१९९२: कानन देवी — भारतीय अभिनेत्री आणि गायिका (जन्म: २२ एप्रिल १९१६ )
१९९२: शांता हुबळीकर — अभिनेत्री (जन्म: १४ एप्रिल १९१४ )
१९५६: बोडो वॉन बोररी — इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाचे सहसंशोधक (जन्म: २२ मे १९०५ )
१९२८: अल्वारो ओब्रेगन — मेक्सिको देशाचे ४६वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १७ फेब्रुवारी १८८० )
१८१२: जॉन ब्रॉडवुड — स्कॉटिश उद्योगपती, जॉन ब्रॉडवुड आणि सन्सचे सहसंस्थापक
१७९०: ॲडॅम स्मिथ — स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता (जन्म: ५ जून १७२३ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

17

## भारतीय गणितविश्वातील तेजस्वी तारा : सी. एस. शेषाद्री

भारतीय गणित क्षेत्रात जागतिक स्तरावर मानाचे स्थान मिळवून देणाऱ्या प्रा. सी. एस. (कॉनजीवरम श्रीरंगाचार्य) शेषाद्री यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. २९ फेब्रुवारी १९३२ रोजी चेन्नई येथे त्यांचा जन्म झाला. बीजगणितीय भूमिती (Algebraic Geometry) या विषयातील त्यांच्या संशोधनामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली.शेषाद्री यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्था (TIFR) येथे दीर्घकाळ संशोधन केले. जागतिक कीर्तीचे गणितज्ञ डेव्हिड मम्फर्ड यांच्यासमवेत त्यांनी विकसित केलेला 'मम्फर्ड–शेषाद्री सिद्धांत' हा आधुनिक गणितातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. त्यांच्या संशोधनाचा उपयोग बीजगणितीय भूमिती आणि गणिताच्या अनेक शाखांमध्ये आजही केला जातो.गणित शिक्षण आणि संशोधनाला चालना देण्यासाठी त्यांनी १९८९ मध्ये चेन्नई मॅथेमॅटिकल इन्स्टिट्यूट (CMI) ची स्थापना करण्यात मोलाची भूमिका बजावली. आज ही संस्था भारतातील अग्रगण्य गणित व संगणक विज्ञान संशोधन संस्थांपैकी एक आहे.त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना १९७५ मध्ये शांती स्वरूप



भटनागर पुरस्कार आणि २००९ मध्ये पद्मभूषण या प्रतिष्ठित सन्मानांनी गौरविण्यात आले. १७ जुलै २०२० रोजी त्यांचे निधन झाले. संशोधन, अध्यापन आणि संस्थाबांधणीच्या माध्यमातून भारतीय गणिताला जागतिक ओळख मिळवून देणारे सी. एस. शेषाद्री हे भावी पिढ्यांसाठी सदैव प्रेरणास्थान राहतील.

## फॉर्म्युला वनला नवी दिशा देणारे जॉन कूपर


जन्मदिन विशेष

मोटारस्पोर्टच्या इतिहासात जॉन कूपर हे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. आधुनिक रेसिंग कारच्या डिझाइनमध्ये क्रांती घडवून आणणारे आणि कूपर कार कंपनीचे सहसंस्थापक म्हणून त्यांनी जागतिक मोटार उद्योगात वेगळे स्थान निर्माण केले. त्यांच्या नावामुळेच आज MINI John Cooper Works (JCW) ही उच्च कार्यक्षमतेच्या कारची मालिका जगभर प्रसिद्ध आहे. १७ जुलै १९२३ रोजी इंग्लंडमधील सरे (Surrey) येथे जॉन न्यूटन कूपर यांचा जन्म झाला. त्यांचे वडील चार्ल्स कूपर हे मोटारगाड्यांचे तंत्रज्ञ आणि रेसिंग कार निर्माता होते. लहानपणापासूनच जॉन यांना वाहन अभियांत्रिकी आणि रेसिंगची आवड होती. दुसऱ्या महायुद्धानंतर त्यांनी



वडिलांसोबत १९४७ मध्ये "Cooper Car Company" ची स्थापना केली. कूपर कार कंपनीने सुरुवातीला लहान रेसिंग कार तयार केल्या. मात्र जॉन कूपर यांनी इंजिन कारच्या मागील बाजूस (Rear-engine layout) बसविण्याची कल्पना प्रत्यक्षात आणली. त्या काळात हा विचार धाडसी मानला जात होता. पुढे हीच रचना फॉर्म्युला वनमध्ये क्रांतिकारक ठरली आणि जगातील बहुतांश रेसिंग कार निर्मात्यांनी तिचा स्वीकार केला. १९५९ आणि १९६० मध्ये ऑस्ट्रेलियाचे महान चालक जॅक ब्रॅभम यांनी कूपर कार चालवत सलग दोन वेळा फॉर्म्युला वन विश्वविजेतेपद जिंकले. या यशामुळे कूपर कार कंपनीची कीर्ती जगभर पसरली. फॉर्म्युला वनच्या इतिहासात मागील बाजूस इंजिन असलेली कार विजेती ठरण्याचा हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. जॉन कूपर यांनी केवळ रेसिंग कारच नव्हे, तर सामान्य रस्त्यावर धावणाऱ्या Mini कारलाही स्पोर्ट्स कारचे रूप दिले. त्यांच्या सुधारित Mini Cooper ने १९६४, १९६५ आणि १९६७ मध्ये प्रतिष्ठित मॉंटे कार्लो रॅली जिंकून जगभर लोकप्रियता मिळवली. त्यानंतर "Mini Cooper" हे नाव वेग, दर्जा आणि उत्कृष्ट कामगिरीचे प्रतीक बनले. मोटार उद्योगातील त्यांच्या योगदानाची दखल घेत ब्रिटन सरकारने त्यांना २००० मध्ये 'ऑर्डर ऑफ द ब्रिटिश एम्पायर (CBE)' हा सन्मान प्रदान केला. २४ डिसेंबर २००० रोजी त्यांचे निधन झाले.आजही फॉर्म्युला वनमधील आधुनिक रेसिंग कारची रचना, तसेच John Cooper Works (JCW) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या उच्च कार्यक्षम Mini कारच्या रूपाने जॉन कूपर यांचा वारसा जिवंत आहे.




**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी**

आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !

सोनेतारण कर्ज

कमीत कमी व्याजदर

जास्तीत जास्त कर्ज

SMBT BANK

बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे

सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा

- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

**नोकरीची सुवर्णसंधी**

**'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'**

**(सौर ऊर्जा कंपनी)** या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

**पदे: Field Sales Executive**
**Business Development Manager**

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

**पात्रता**

* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

**सुविधा**

आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटिव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165


# जिल्ह्यात एसआयआर ४० टक्के काम पूर्ण

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -जिल्ह्यातील विशेष संक्षिप्त पुनरिक्षण अभियानासाठी (एसआयआर) केंद्रीय निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या मुदतीच्या, निम्म्या कालावधीत आत्तापर्यंत ३८ लाख १० हजार १०२ पैकी १५ लाख ४२ हजार ६५० (४०.४९ टक्के ) मतदारांची पडताळणी (डिजिटायझेशन) आज, बुधवारपर्यंत झाली आहे. आता उर्वरित निम्म्या कालावधीत तब्बल २२ लाख ६७ हजार ४५२ मतदारांची पडताळणी होणे बाकी आहे.

'एसआयआर'साठी ३८३० बीएलओ जिल्ह्यात नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठी ४२२ पर्यवेक्षक आहेत. २९ जुलैपासून हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. तो ३० जूनपर्यंत चालेल. त्यासाठी बीएलओ घरोघर भेट देऊन गणना प्रपत्र वितरित करत आहेत. गणना प्रपत्र वितरणाचे काम जवळपास (९६.१६ टक्के ) आटोपलेले आहे. अद्याप १ लाख ७१ हजार ३५८ मतदारांना प्रपत्र वितरित करण्याचे काम बाकी आहे. त्यामध्ये बहुसंख्य स्थलांतरित, निधन झालेले आहेत. ५ ऑगस्टला प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यावर ९ सप्टेंबर पर्यंत हरकती व दावे दाखल करता येणार आहेत. अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबरला प्रसिद्ध होईल.

वितरीत केलेले गणना प्रपत्र ३० जूनपर्यंत मतदारांकडून भरून घेऊन बीएलओ यांनी त्याचे 'डिजिटायझेशन' करावयाचे आहे. हे काम ४०.४९ टक्के झालेले आहे. मतदारांचे डिजिटायझेशन पडताळणी झालेले मतदारसंघनिहाय काम पुढीलप्रमाणे- अकोले ३८.७२ टक्के, संगमनेर ३७.८१, शिर्डी ३९.९८, कोपरगाव ४९.९१, श्रीरामपूर ३७.२८, नेवासा ३२.६९, शेवगाव ४१.५०, राहुरी ३७.५६, पारनेर ४५.२१, अहिलानगर शहर ३७.०४, श्रीगोंदा ३६.२६ टक्के व कर्जत - जामखेड ५०.०६ टक्के.


**चैतन्य हॉस्पिटल**

डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

अत्याधुनिक लॅमिनार शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटर

* मेंदुविकार शस्त्रक्रिया
* खुबा प्रत्यारोपण
* गुडघा प्रत्यारोपण
* पोटाच्या शस्त्रक्रिया
* किडनी शस्त्रक्रिया
* मुत्रविकार शस्त्रक्रिया
* दुर्बिणीद्वारे पोटाच्या व आतड्याच्या शस्त्रक्रिया

२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मो. ७०३८२७०३८२




**अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या**

**स्त्रियांच्या समस्या**

मासिक पाळीच्या तक्रारी, अंगावरून पांढरे जाणे, गर्भ न रहाणे, वारंवार गर्भपात होणे, गर्भाशयात गाठी, गर्भाशयाचा कर्करोग, स्तनांची वाढ न होणे, स्तनातून दूध न येणे, स्तनात गाठी, स्तनाचा कर्करोग, योनी मार्गाची दुर्गंधी, गुप्त अंगाला खाज, विविध त्वचा विकार, गुप्तरोग, गर्मी, लघवीला जळजळ, संभोगात रस न येणे, संभोगा विषयीची भीती, हस्तमैथूनाची सवय, लैंगिक विकृती, मानसिक नैराश्य

डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )

1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त

डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर

www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

**कुटे हॉस्पिटल** अँड लॅप्रोस्कोपी सेंटर

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine

• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर

सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225

४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६


दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25